क्रमांक : संकीर्ण-४१०८/८७२/प्र.क्र.७३/०८/नापु -२८
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०६ ऑगस्ट, २००८

प्रति,

नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
सर्व उप आयुक्त (पुरवठा)
सर्व अपर जिल्हाधिकारी,

**विषयः शिधापत्रिका देण्यापूर्वी व वाहन चालक परवाना देण्यापुर्वी अर्जदाराचे नाव पत्ता आणि त्यांच्या पुर्व चारित्र्याची पडताळणी करण्याबाबत केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सूचना.**

संदर्भ : शासनाचे समक्रमांकाचे दिनांक २१.२.२००८ चे पत्र

उपरोक्त विषयावरील संदर्भाधिन शासन पत्रान्वये दहशतवाद्यांकडून पॅनकार्ड, पारपत्र इत्यादी सुविधा प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांचे भारतीय नागरीक असल्याचे सिध्द होण्यासाठी बनावट शिधापत्रिका व वाहन चालक परवाने अशा दस्तऐवजांचा आधार घेतला जात असल्याचे केंद्रिय गृह मंत्रालयास आढळून आले आहे. त्यामुळे केंद्रिय गृह मंत्रालयाने सदर फॅक्स संदेशाद्वारे अशी विनंती केली आहे की, अशा प्रकारची भारतीयत्वाची ओळख सिध्द होणारे दस्तऐवज देण्यापुर्वी अर्जदाराचे नांव, पत्ता आणि त्यांच्या पूर्वचारित्र्याची पडताळणी केल्यानंतरच सदरचे दस्तऐवज अर्जदारांना देण्यांत यावेत. जेणेकरुन कोणीही दहशतवादी बनावट दस्तऐवजांच्या आधारे पॅनकार्ड, पारपत्र इत्यादी सुविधा प्राप्त करुन घेऊ शकणार नाही. भारतीय नागरीकत्वाची ओळख सिध्द होणारे दस्तऐवज अर्जदारांना देतांना केंद्रिय गृहमंत्रालयाच्या सूचना आपल्या निदर्शनास आणण्यांत आल्या होत्या व सदर सूचनांचे अनुपालन करणेबाबत आपणस कळविण्यांत आले होते.

शिधापत्रिका देण्यापूर्वी पूर्व चारित्र्याची पडताळणी करण्याबाबत संदर्भाधिन शासनपत्रान्वये देण्यांत आलेल्या सूचना मागे घेण्याबाबत विधान सभा सदस्य, विविध संघटना व वर्तमानपत्रातील बातमीद्वारे मागणी करण्यांत येत असल्यामुळे दिनांक २१/०२/२००८ च्या शासन पत्राद्वारे दिलेल्या सूचनांना तुर्त स्थगिती देण्यांत येत आहे.

सदर पत्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संगणक सांकेतांक २००८०८०७१११२१३३००१ असा आहे.

***( भै. भा. पारखी )***
उप सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना त्यांचे पत्र क्रमांक एमआयएम-२००७ /पीपीएस/सीआर-१७८/विदेशी-२, दि.१३/०३/२००७ संदर्भात अग्रेषित.